**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ , अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त द्वितीय अपिल**

**अपिल क्र.१४६२/२०११**
जा.क्र.
दिनांक -

अर्जदार तथा अपिलकर्ता
श्री अब्दुल मुनाफ शेख रसुल
मोमीनपुरा, पातुर जि.अकोला

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन)
अमरावती विभाग, अमरावती

२. जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक विक्रीकर आयुक्त,
अकोला

**(आदेश पारीत दिनांक ०५/०१/२०१२)**

**- निर्णय -**

अर्जदार तथा अपिलकर्ता गैरहजर आहे तथापि आजारी असल्यामुळे पुढील तारीख मिळणेबाबत फॅक्स द्वारे पाठविलेला विनंती अर्ज दि.३/१/१२ ला प्राप्त झाला. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे श्री पि.बी.गोटे, सहा.विक्रीकर आयुक्त (व्हॅट प्रशासन) अमरावती हजर आहे. श्री एम.एम.ओहेकर, जन माहिती अधिकारी तथा प्रभारी सहा.विक्रीकर आयुक्त, अकोला हजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांचा संयुक्त लेखी खुलासा दाखल करण्यात आला.

अर्जदार तथा अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये जोडपत्र-अ नुसार दि. ३/१०/०९ रोजी जन माहिती अधिकारी, विक्रीकर, विक्रीकर भवन, अकोला यांचेकडे अर्ज करुन माहिती मागितली होती. अर्जदाराने या आयोगाकडे दि.४/६/११ ला दाखल केलेल्या अपीलासंबंधी आज सुनावणी घेण्यात आली. उत्तरवादी तर्फे संयुक्त लेखी खुलासा दाखल करण्यात आला त्याची झेरॅाक्स प्रत उत्तरवादी यांनी अर्जदाराला पोष्टाद्वारे पाठवावी तसेच ज्या शाळेकडुन व्यवसाय करवसुली करण्यात आली त्याबाबतचा सविस्तर तपशील अर्जदाराला जन माहिती अधिकारी यांनी पाठवावा असे सांगण्यात आले. ज्या शाळा विनाअनुदानित आहेत त्यांचेकडुन वसुलीबाबत कार्यवाही झाली नाही परंतु त्यासंबंधी शहानिशा करुन नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल असे उत्तरवादी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले त्याबाबतीत सुध्दा तसे अर्जदाराला लेखी कळवावे. सदरची सर्व माहिती व खुलाशाची प्रत अर्जदाराला आठ दिवसामध्ये जन माहिती अधिकारी यांनी

विनाशुल्क पाठवावी व तसा अहवाल या आयोगास पाठवावा असे आदेशीत केल्यामुळे पुढील तारखेची आवश्यकता वाटत नाही. उत्तरवादी यांनी आज या आयोगासमोर अर्जदाराला पोस्टाने माहिती पाठविण्याचे कबुल केले. त्या कारणावरुन सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**- आदेश -**

उत्तरवादी तर्फे या आयोगाकडे जो संयुक्त लेखी खुलासा दाखल करण्यात आला त्याची झेरॉक्स प्रत आणि ज्या शाळेकडुन व्यवसाय करवसुली करण्यात आली त्याबाबतचा सविस्तर तपशील अर्जदाराला जन माहिती अधिकारी यांनी पाठवावा. ज्या शाळा विनाअनुदानित आहेत त्यांचेकडुन वसुलीबाबत कार्यवाही झाली नाही परंतु त्यासंबंधी शहानिशा करुन नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल असे उत्तरवादी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले त्याबाबतीत सुध्दा तसे अर्जदाराला लेखी कळवावे.

वरील सर्व माहिती व खुलाशाची प्रत अर्जदाराला आठ दिवसामध्ये जन माहिती अधिकारी यांनी विनाशुल्क पाठवावी व तसा अहवाल या आयोगास पाठवावा.

वरीलप्रमाणे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

जिसकार/